झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा./सप्रा१/मा.क्र.२३५/५१२/अ हरकानगर/9038/२०२२
दिनांक : 28/09/२०२२

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश
## (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे उक्त अधिनियम असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद भवानी पेठ येथील सि.स.नं. ५१२/अ, हरकानगर, भवानी पेठ, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर (पूर्णत:) अंदाजे क्षेत्रफळ ११७५.२५ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर मिळकत असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी सदर क्षेत्रातील ७०% पेक्षा जास्त झोपडीधारकांनी संमती देऊन नियुक्त केलेले विकसक मे. पुष्पगंगा डेव्हलपमेंट्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.१६/०७/२०१६ रोजी झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे; आणि सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे आवश्यक असल्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे यांची खात्री पटली आहे; आणि

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र हे पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये पुर्णत: समाविष्ट करणेत आले आहे; आणि

ज्याअर्थी, उक्त क्षेत्र तत्कालीन सक्षम प्राधिकारी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यानी सदरचे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०८/१२/१९८३ पृष्ठ क्र. ३३१४ वर प्रसिद्ध अधिसूचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केले आहे; आणि

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले हे क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे. आणि

या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले खाजगी व्यक्ती / शासकिय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था यांना असे सूचित करण्यात येते की, त्यानी उक्त क्षेत्र पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत त्यांची कोणतीही सूचना /आक्षेप/ हरकत असल्यास, ती सदरचा आदेश प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी

पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे - १६ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात आवश्यक ती कागदपत्रे आणि पुराव्यांसह सादर करावी. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे आणि सबळ पुराव्याशिवाय दाखल केलेले कोणतेही आक्षेप / हरकती / सूचना / दावे या कार्यालयाकडे स्विकारले जाणार नाहीत अथवा विचारात घेतले जाणार नाहीत याची जाणीव याद्वारे करून देण्यात येत आहे.

उपरोक्त विहीत मुदतीत मालकी हक्क प्राप्त असलेल्या खाजगी व्यक्ती / शासकिय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था यांचेकडून प्राप्त आक्षेप / हरकती / सूचना / दावे यावर त्यांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल. त्यांचे म्हणणे व दाखल केलेले कागदपत्र आणि पुरावे विचारात घेऊन उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) अन्वये सदरचा आदेश कायम करण्याबाबत व अधिसूचनेमध्ये समाविष्ट क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमतः घोषित करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. असा निर्णय मा.उच्च स्तरीय तक्रार निवारण समिती, बांद्रे, मुंबई यांच्याकडे दाखल त्यावरील कोणत्याही अपिलातील निर्णयास अधिन राहुन अंतिम असेल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव :** सि.स.नं. ५१२/अ, हरकानगर, भवानी पेठ, पुणे

**महानगर पालिका क्षेत्र :** पुणे

| पेठ / गाव / नगररचना योजना | स.नं. / सि.स.नं. / अंतिम भूखंड क्र. | जमीनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव | क्षेत्र ( चौ. मी.) अंशत: / पूर्णत: | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सि.स.नं. ५१२/अ, भवानी पेठ, पुणे | सि.स.नं. ५१२/अ, | सरकार | ११७५.२५ चौ.मी. | पुर्वेस - लागू न. भु. क्र. ५१२ ब<br>पश्चिमेस - लागू न. भु. क्र. ५१३ अ + ब,<br>दक्षिणेस - लागू न. भु. क्र. ५१४<br>उत्तरेस - लागू न. भु. क्र. ३८३, | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

दिनांक :- २८/०९/२०२२

२०.९.२२

राजेंद्र निंबाळकर (भा. प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

O/C

प्रत :- रजि. पोस्ट द्वारे

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, यांना जमीन शासकिय मालकिची असल्याने आपले लक्ष उक्त अधिनियमाच्या सुधारित कलम ३ क कडे वेधण्यात येत आहे. उक्त आदेश अंतिम करण्यात आल्यानंतर या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी आपल्या अथवा आपल्या विभागाच्या वेगळ्या संमती अथवा ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही. खाजगी क्षेत्राचे बाबतीत विकसकाकडे मालकी / विकसन हक्क नसल्यास ते क्षेत्र उक्त अधिनियमामधील प्रकरण पाच मधील तरतूदींन्वये संपादित करण्यात येईल तसेच अशा शासकिय / निमशासकिय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकिच्या तसेच संपादित खाजगी क्षेत्राचा मोबदला उक्त अधिनियमाच्या कलम १७ मधील तरतूदीनुसार निर्धारित करण्यात येईल इतका अनुज्ञेय असेल.

२. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र १, झोपुप्रा पुणे यांना सूचित करण्यात येते कि या अधिसूचनेच्या प्रती योजनाक्षेत्र / झोपडपट्टी क्षेत्रात डकवून प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी

१. मा. जिल्हाधिकारी, पुणे

२. मा. आयुक्त, पुणे, महानगरपालिका यांना गवनि / झोनिपू विभागाचे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
वरिल अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात हि विनंती

४. विकसक मे. पुष्पगंगा डेव्हलपमेंट्स, ५०१,सन माहू कॉम्प्लेक्स, बंड गार्डन रोड, पुणे - ०१.